# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः03.12.2025** **वारःबुधवार**

---

1. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज तिरुवनन्तपुरम इथं नौदलाच्या ऑपरेशनल डेमो मध्ये सहभागी होणार
2. पंतप्रधान कार्यालयाचं नामकरण सेवातीर्थ करण्यात येत असल्याची केंद्र सरकारची घोषणा
3. दितवा चक्रीवादळामुळे श्रीलंकेत उद्भवलेल्या आपत्तीला, भारत सरकार कडून 'ऑपरेशन सागर बंधु' अंतर्गत मदत
4. भारत आणि दक्षिण आफ्रिका दरम्यान मर्यादित षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज रायपूर इथे खेळवला जाणार आणि
5. पंजाब आणि मध्य महाराष्ट्रात आज थंडीची लाट येण्याची शक्यता - हवामान विभागाचा अंदाज

**केरळ**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आज दुपारी केरळ मधील तिरुवनन्तपुरम इथं नौदलाच्या ऑपरेशनल डेमो मध्ये प्रमुख पाहुण्यां म्हणून सहभागी होणार आहेत. तिरुवनंतपुरमजवळील षण्मुघम समुद्रकिनाऱ्यावर हा कार्यक्रम होणार असून एमएच 60 आर हेलिकॉप्टरमधून राष्ट्रपतींना हवाई सलामी देण्यात येईल. या ऑपरेशनल डेमोमधुन 19 आघाडीच्या युद्धनौका आणि 32 विमानं आपल्या नौदलाची ताकद आणि युद्धाची तयारी दर्शवण्यात येईल. त्यानंतर राष्ट्रपती लोकभवनला भेट देणार आहेत.

**लोकभवन**

पंतप्रधान कार्यालयाचं नामकरण सेवातीर्थ, केंद्रीय सचिवालयांचं नामकरण कर्तव्यभवन तर राजभवनाचं नामकरण लोकभवन करण्यात येत असल्याची घोषणा काल केंद्र सरकारनं केली. त्यानुसार महाराष्ट्र राजभवनचे नाव आता 'महाराष्ट्र लोकभवन' असे करण्यात आले आहे. महाराष्ट्र आणि गुजरातचे राज्यपाल आचार्य देवव्रत यांनी या संदर्भात राजभवन सचिवालयाला निर्देश दिले आहेत.'लोकभवन' हे आता केवळ राज्यपालांचे निवासस्थान आणि कार्यालय न राहता, राज्यातील विविध समाज घटकांच्या संवाद आणि सहभागाचे एक केंद्र व्हावे अशी अपेक्षा राज्यपालांनी व्यक्त केली आहे. तर श्रेष्ठ भारताच्या निर्मितीच्या दिशेनं देशाच्या प्रवासात हा एक महत्वाचा टप्पा असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ज्यामध्ये सेवा आणि सुशासन यालाच प्राधान्य असेल, असंही ते म्हणाले.

**सागर-बंधु मोहीम-जयशंकर कोलंबो**

दितवा चक्रीवादळामुळे श्रीलंकेत उद्भवलेल्या आपत्तीला, भारत सरकार 'ऑपरेशन सागर बंधु' अंतर्गत मदत पुरवत आहे. भारतीय वायुदलाच्या हेलिकॉप्टरने श्रीलंकेतील विविध ठिकाणांहून, पुराच्या पाण्यात अडकलेल्या सुमारे 47 जणांची काल सुटका केली. दरम्यान भारतीय हवाई दलाचं सी 17 हे वाहतूक विमान काल कोलंबो इथं उतरलं असून या विमानात एक सर्व सोईंनीयुक्त इस्पितळ, 70 पेक्षा अधिक वैद्यकीय आणि सहाय्यक कर्मचारी आणि आवश्यक असलेली वाहनं आहेत असं परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी म्हटलं आहे. श्रीलंकेतील पूरग्रस्तांना भारत सर्वतोपरी मदत करेल असंही त्यांनी आपल्या समाज मध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. आत्तापर्यंत 8 टनांहून अधिक साहित्य श्रीलंकेत पोहोचवण्यात आलं असून परदेशी नागरिक, गंभीर आजारी रुग्ण आणि एका गर्भवती महिलेसह 65 जणांना सुरक्षित स्थळी पोहोचवण्यात आलं असल्याचंही त्यांनी सांगितलं.

**<u>पुतीन-भारत भेट</u>**

रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्या 23 व्या भारत -रशिया वार्षिक शिखर परिषदेच्या आगामी भारत दौऱ्यामध्ये भारत आणि रशिया  दरम्यान अनेक करार होण्याची शक्यता असल्याचं परराष्ट्र मंत्रालयातील एका अधिकाऱ्याने  दिलेल्या माहितीत म्हटलं आहे. व्यापार, अर्थव्यवस्था, आरोग्यसेवा, शैक्षणिक, संस्कृती आणि माध्यमांशी संबंधित क्षेत्रात हे  करार केले जातील. या भेटीदरम्यान उभय देशांमधील वाढत्या व्यापार आणि आर्थिक संबंधांवर लक्ष केंद्रित केले जाईल. असंही ते म्हणाले. भारत आणि रशियामध्ये संरक्षण, ऊर्जा आणि अंतराळ क्षेत्रातील सहकार्य खूप महत्त्वाचं राहिलं आहे. अलिकडच्या काही महिन्यांत रशियासोबत भारताची व्यापार तूट भरून काढण्यासाठी प्रयत्न केले जात आहेत. या कराराच्या माध्यमातून उभय देशांमधील संबंध आणखी दृढ करण्यासाठी दोन्ही देश उत्सुक असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<u>दिल्ली स्फोट</u>**

10 नोव्हेंबरला दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटाच्या पार्श्वभूमीवर सुरू असलेला खटला आणि त्यासंदर्भातील बाबींसाठी गृह मंत्रालयानं वरिष्ठ वकील माधव खुराना यांची विशेष सरकारी वकील म्हणून नियुक्ती केली आहे. या प्रकरणात एनआयए अर्थात राष्ट्रीय तपास यंत्रणेनं आतापर्यंत सात आरोपींना अटक केली आहे.

**<u>काशी तमिळ सांगमं</u>**

काशी आणि तामिळनाडू मधील पूर्वापार चालत आलेले  संबंध दृढ करण्याच्या उद्देशानं सुरू करण्यात आलेल्या 'काशी-तमिळ संगमम' च्या उपक्रमाला काल सुरुवात झाली. या  उपक्रमाचं हे चौथं वर्ष आहे. त्यासाठी तामिळनाडू मधील 216 सदस्यांचं पहिलं शिष्टमंडळ काशीला पोहोचलं असून आज ते अनेक उपक्रमांमध्ये सहभागी होणार आहेत. या शिष्टमंडळात तमिळ साहित्यिक, सांस्कृतिक विद्वान, तसंच विद्यार्थी, शिक्षक, कारागीर, शास्त्रीय गायक, आचार्य आणि आध्यात्मिक ग्रंथाच्या  विद्यार्थ्यांचा समावेश आहे.

**<u>टी बी दर</u>**

भारतातील 2015 मध्ये, प्रती लाख लोकसंख्ये मागे 28 असलेला क्षयरोग मृत्युदर, 2024 मध्ये 21 पर्यंत कमी झाला असल्याची माहिती केंद्रीय आरोग्यमंत्री जे. पी. नड्‌डा यांनी दिली. दिल्लीतील संसद भवनात काल, क्षयरोग मुक्त भारत अभियानसंदर्भात संसद सदस्यांना संबोधित करताना ते बोलत होते. या प्रसंगी त्यांनी खासदारांना त्यांच्या संबंधित मतदारसंघांमध्ये मोहिमेचं निरीक्षण करण्याचे, क्षयरोगाविषयी जागरूकता वाढविण्याचे, या आजारा विषयीचे गैरसमज कमी करण्याचे आणि मोहिमेत सक्रियपणे सहभागी होण्याचे निर्देश दिले.

**<u>पत धोरण बैठक</u>**

भारतीय रिझर्व बँकेच्या वित्त आणि पत धोरण समितीची द्वैमासिक बैठक आजपासून सुरु होणार आहे. येत्या शुक्रवारी बैठक संपल्यावर गव्हर्नर संजय मल्होत्रा पतधोरणाचा द्वैमासिक आढावा जाहीर करतील. या आधीच्या दोन आढाव्यांमधे व्याजदरात बदल झालेला नाही. यावेळी पाव टक्के कपात होण्याची शक्यता तज्ञ वर्तुळात व्यक्त होत आहे.

**<u>मतदान</u>**

महाराष्ट्रातल्या 264 नगरपंचायती आणि नगरपरिषदांसाठी काल मतदान झालं. काही अपवाद वगळता मतदान प्रक्रिया शांततेत पार पडली. दरम्यान राज्यातील सर्व 288 नगरपरिषदा आणि नगरपंचायतींची मतमोजणी येत्या 21 डिसेंबर रोजी करण्याचा आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने दिला आहे. त्याचबरोबर मतदानोत्तर चाचण्यांचे निष्कर्षही 20 डिसेंबर रोजी मतदान संपल्यानंतर पुढील अर्ध्या तासापर्यंत जाहीर करता येणार नाहीत, असंही न्यायालयानं म्हटलं आहे. न्यायालयाच्या आदेशाच्या अनुषंगानं राज्य निवडणूक आयोगानेही संबंधित सर्व जिल्हाधिकाऱ्यांना निर्देश दिले आहेत.

**एन एच ए आय**

राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण अर्थात एन एच ए आय नं राष्ट्रीय महामार्गांवर दूरसंचार आधारित सुरक्षा सूचना प्रणाली तैनात करण्यासाठी रिलायन्स जिओ कंपनी सोबत करार केला आहे. महामार्गाचा वापर करणाऱ्या प्रत्येकाला वेळेवर माहिती देऊन रस्ता सुरक्षा मजबूत करणं असा या उपक्रमाचा उद्देश असल्याचं रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयानं म्हटलं आहे. या उपक्रमांतर्गत प्रवाशांना त्यांच्या फोनवर संदेशाद्वारे अथवा कॉल द्वारे रस्त्यांवरील धोके, आणि वाहतूक कोंडीविषयी आगाऊ सूचना मिळणार आहेत. टप्प्याटप्प्यानं सर्व महामार्ग यामध्ये संविष्ट केले जाणार असून एन एच ए आय च्या डिजिटल प्लॅटफॉर्मसह राजमार्ग मोबाइल ॲप आणि आपत्कालीन मदत क्रमांक 1033 चा ही समावेश असणार आहे.

**क्रिकेट**

भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातल्या मर्यादित षटकांच्या क्रिकेट सामन्यांच्या मालिकेतला दुसरा सामना आज रायपूर इथं खेळवला जाणार आहे. मालिकेत पहिला सामना जिंकून भारत या मालिकेत एक शून्यनं आघाडीवर आहे.

**हॉकी**

एफ आय एच कनिष्ठ हॉकी विश्वचषक स्पर्धेत काल मदुराईत झालेल्या सामन्यात भारतीय संघाने स्वितझरलँड संघाचा 5-0 असा धुव्वा उडवत उप-उपांत्यपूर्व फेरी गाठली. शारदानंदला सामनावीर घोषित करण्यात आलं. येत्या शुक्रवारी चेन्नईत, उपांत्यपूर्व फेरीत, भारताची लढत बेल्जियम संघाशी होणार आहे. चिली मध्ये महिला एफ आय एच कनिष्ठ हॉकी विश्वचषक स्पर्धा खेळली जात आहे. या स्पर्धेत आज भारतीय संघाचा सामना जर्मनीशी होणार आहे.

**हवामान**

पंजाब आणि मध्य महाराष्ट्रात आज थंडीची लाट येण्याचा अंदाज भारतीय हवामान विभागानं वर्तवला आहे. तर केरळ, तामिळनाडू, पुडूचेरी आणि काराईकलच्या काही भागात आज सोसाट्याचे वारे, ढगांच्या गडगडाटासह मध्यम ते मुसळधार पावसाची शक्यताही वर्तवण्यात आली आहे. आसाम, मेघालय, हिमाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि ओडिशामधील काही ठिकाणी आज दाट धुक्याची परिस्थिती राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, दिल्ली-एनसीआरमधील हवेची गुणवत्ता अजूनही अत्यंत निकृष्ट श्रेणीत असल्याचं केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानं म्हटलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं नमस्कार.